स्पेशल केस नं.३१/ २०२३

निशाणी ४४

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ याची जबानी**

**मी, सत्य प्रतिज्ञेवर असे कथन करतो की,**

| | |
|---|---|
| माझे नांव | - अनिल आसाराम बलफे |
| वय | - ४२वर्ष |
| व्यवसाय | -टेलरिंग व्यवसाय |
| राहणार | -हनुमान टाकळी ता. पाथर्डी जि. अहमदनगर |

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे ए.डी.ढगे वकील**

१. दि. १६.०५.२०२० रोजी पोलीस हवालदार श्री. तांबे यांनी मला पंचनामा करणेसाठी बोलविले होते. दुसरे पंच विठठल बलफे हजर होते. घटनास्थळ चंद्रकांत गायकवाड व विंठठल गायकवाड या दोघा च्या घरांच्या मध्ये समाईक रस्त्यावर होते. घटनास्थळ फिर्यादी विठठल गायकवाड यांनी दाखविले. त्याप्रमाणे पोलीसांनी पंचनामा तयार केला व नकाशा काढला. आम्ही पंचनाम्यावर वाचुन सहया केल्या. सदर पंचनामा मला दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी ४५** देण्यात येत आहे.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपी तर्फे श्री.आर.पी.शेलोत वकील**

२. माझे मुळ गांव हनुमान टाकळी आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी सुध्दा हनुमान टाकळी येथील आहे. फिर्यादीचे आईचे नाव लताबाई आहे. हे म्हणणे खरे नाही की, लताबाई कडुन आम्ही फिर्यादीचे नातेवाईक लागतो. फिर्यादी आज न्यायालयात आलेला नाही. मी आज फिर्यादी सोबत आलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही फिर्यादी विठठल यांच्या आईचे मामाची मुले आहोत. आम्हांला दि. १६.०५.२०२० रोजी पाथर्डी पोलीस स्टेशनला बोलविले नव्हते. मी गावातुन घरी जात असताना पोलीसांनी मला थांबविले होते. पंचनामा चालु असताना

त्यांनी मला बोलविले. गायकवाड वस्ती  कारखाना ते हनुमान टाकळी रोडवर आहे. गायकवाड वस्तीच्या शेतीचा गट नंबर सांगता येणार नाही. उत्तरेला विठठल गायकवाड यांचे घर आहे. दक्षिणेला चंद्रकांत गायकवाड यांचे घर आहे. हे म्हणणे  खरे नाही की, विठठल गायकवाड यांचे घर रस्त्याला लागुन आहे. ज्या जागेवर पंचनामा झाला ती जागा कोणाच्या मालकिची आहे त्याची खात्री केली नाही.  हे म्हणणे  खरे  आहे की, पोलीसांनी घटनास्थळावर  काहीही जप्त केले नाही. दुसरे पंच विठठल बलफे माझे चुलत भाउ आहे.  हे म्हणणे  खरे नाही की, फिर्यादी विठठल गायकवाड नातेवाईक असल्याने  त्यांचे सांगणेवरुन,माझे समोर पंचनामा झाला नसतांना ,त्यावर सहया करुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास पुर्ण .

श्रवणोत्तर स्विकृती,

(आर डी चव्हाण )
अति सत्र न्यायाधीश  अहमदनगर

दिनांक २७/०१/२०२६
अहमदनगर